कनिष्ठ अभियंतांना शाखा अभियंता पदाचा दर्जा देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
पाटबंधारे विभाग,
शासन निर्णय क्रमांक : नियुक्ती १२९९/(१४/९९) आ.(शा.अ.)
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ९ फेब्रुवारी, २०००

वाचा : १) शा.नि., पा.वि., क्र. सीडीएस १५८२/१५८/(२१५)/आ.१०/दि.१६.४.८४
२) शा.नि., पा.वि., क्र. बीसीएस २४८४/(१०७) आ.(२), दि.२८.९.८४
३) शासन पत्र क्रमांक नियुक्ती १२८५/(११६)/आ.(शा.अ.) दि.१३.१२.१९८५
४) शा.नि., सा.प्र.वि., क्र. एसआरव्ही १०८८/(प्र.क्र.११/८८)बारा, दि.२१.२.९४
५) शा.नि., पा.वि., क्र. वेपूर १०९२/(६२९/९२) आ(क्षेप्र), दि.१४.१२.१९९५
६) शा.नि., सा.प्र.वि., क्र. सीएफआर १२९५/प्र.क्र.३६/९५/तेरा, दि.१.२.९६
७) शासन अधिसूचना, पा.वि.,क्र. एमएससी १०८४/(६१)/आ(संनि), दि. १६.६.१९९७

**प्रस्तावना :** शासनाच्या सेवेत कार्यरत असलेल्या कनिष्ठ अभियंताना राजपत्रित दर्जा देऊन उपरोल्लिखित दि.१६.४.८४ च्या शासन निर्णयान्वये पूर्वलक्षी प्रभावाने दि.१.४.८१ पासून 'शाखा अभियंता' हा संवर्ग निर्माण करण्यात आलेला असुन शासन निर्णय दि २८.९.८४ अन्वये कनिष्ठ अभियंत्यांना शाखा अभियंता पदी दर्जोन्नती देताना मार्गदर्शक तत्वे ठरविण्यात आलेली आहेत. तथापि आतापर्यंत अनुभवास आलेल्या अडचणी तसेच बदललेली परिस्थिती (उदा. शाखा अभियंता पदाचे सेवा प्रवेश नियम तयार होणे, गोपनीय अहवालाचे मुल्यांकनात सामान्य प्रशासन विभागाच्या दि.१.२.१९९६ च्या शासन निर्णयान्वये झालेला बदल इ.) विचारात घेता सदर मार्गदर्शक तत्वांमध्ये काही बदल करणे शासनाच्या विचाराधिन होते. या बाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

शासन निर्णय, दि.१६.४.८४ व २८.९.८४ प्रमाणे कनिष्ठ अभियंताना शाखा अभियंतांचा दर्जा देण्यासाठी विहित करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हता, सेवा कालावधी व गोपनीय अहवालाचे निकष या मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

| | कनिष्ठ अभियंतांची वर्गवारी<br>१. | राजपत्रित दर्जा मिळण्यासाठी लागणारा आवश्यक सेवाकाळ.<br>२. |
|---|---|---|
| अ | ३ वर्षाची पदविका वा त्याहून उच्च अर्हता धारण केलेले सरळ सेवाप्रविष्ठ कनिष्ठ अभियंते | ५ वर्षे |
| ब | २ वर्षाची पदविका किंवा तत्सम अर्हता धारण केलेले सरळ सेवा प्रविष्ठ कनिष्ठ अभियंते | ७ वर्षे |
| क | वरील 'अ' व 'ब' येथे न मोडणारे इतर अर्हतारहित कनिष्ठ अभियंते. | १० वर्षे |

२    दि.१.४.९८ व तदनंतर शाखा अभियंता पदावर नियुक्ती देण्यासाठी विहित सेवा कालावधी पुर्ण करणाऱ्या कनिष्ठ अभियंतांना शाखा अभियंता पदाचा दर्जा देण्यासाठी मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात येतील व पात्रतेसाठी गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी **'चांगला'** पेक्षा कमी नाही, असा निकष राहील.

३.    कनिष्ठ अभियंतांना शाखा अभियंता पदी दर्जोन्नती देण्यासाठी शिफारस करण्याकरीता खालील अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात येत आहे :-

| | | |
|---|---|---|
| मुख्य अभियंता व सह सचिव (वर्ग-२ आस्थापनेचे प्रभारी) | - | अध्यक्ष |
| उप सचिव (प्रशासन) | - | सदस्य |
| अवर सचिव (रा.क.से.) | - | सदस्य-सचिव |

४.    सर्व प्रादेशिक मुख्य अभियंत्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील शाखा अभियंता पदी दर्जोन्नतीसाठी प्रत्येक वर्षी दिनांक १ एप्रिल रोजी विहित सेवा कालावधी पुर्ण करणाऱ्या अभियंत्यांचे प्रस्ताव प्रत्येक वर्षी ३१ ऑगस्ट पूर्वी शासनास न चुकता सादर करावेत. अशाप्रकारे प्रस्ताव सादर करताना संबंधित मुख्य अभियंतांनी प्रस्तावासोबत पाठविण्यात येत असलेले गोपनीय अभिलेख परिपूर्ण असल्याची तसेच, गोपनीय अहवालाचे नियमानुसार संस्करण झाले असल्याची खात्री करुन प्रस्ताव शासनास सादर करावेत. या बाबत शासन परिपत्रक क्र.नियुक्ती १२९९/(३५७/९९) आ.(शा.अ.), दि.१२.७.९९ तथा नियुक्ती १२९९/(३५९/९९) आ.(शा.अ.) , दि.१२.७.९९ या मधील सूचना विचारात घ्याव्यात. विहित मुदतीत परिपूर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त न झाल्यास याबाबत व्यक्तिशः जबाबदारी संबंधित अधिक्षक / विशेष अधिक्षक व मुख्य अभियंतांची राहील.

५.    उपरोल्लिखित दि.१६.४.८४ तथा दि.२८.९.८४ चे आदेश दि. १.४.१९९८ व त्यानंतरच्या प्रस्तावांसाठी याद्वारे अधिक्रमित/सुधारित झाले आहेत, असे समजावे.

६.    हे आदेश दि.१.४.९८ पासून अंमलात येतील. तथापि या शासन निर्णयातील तरतुदींसंदर्भात यापूर्वी जर काही निर्णय घेण्यात आला असेल तर अशी प्रकरणे पुन्हा सुरु करण्याची आवश्यकता नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संगणक सांकेतांक क्र. 201501141625377527

( द. ल. थोरात )
शासनाचे उप सचिव.